**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2016 = 6.177, www.srjis.com*
*UGC Approved Sr. No.49366, MAR–APR, 2018, VOL- 5/44*

# जात आणि लिंगभाव

**सुजाता कराडे, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, समाजशास्त्र श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, रतनशीनगर, सांगली.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान व्यवस्था आहे. हे जरी खरे असले तरी पुरुषप्रधान व्यवस्थेचे स्वरूप स्थल, काल, परत्वे एकच स्वरूपाची आहेत. हे आजही आपणास मान्य करावे लागते. भारतीय संदर्भात जातीव्यवस्था रोड असल्याने येथील पुरुषप्रधानव्यवस्थेला विशिष्ट स्वरूपात प्राप्त झाले आहे. त्यामुळे येथील स्त्रियांना व शूद्रांना एकच उपमा दिली आहे. शक्ती म्हणजे स्त्री ही शुद्राती शूद्र आहे. त्यामुळे स्त्रियांना फ्री स्वभाव, स्त्री धर्म यांच्या तोडून तिला जाती व्यवस्थेची सांगड घातली आहे. आज स्त्रिया किती शिकला किंवा उच्च पदावर असला तरी तेथील स्थानिक त्या त्या जातीच्या चौकटीत आहेत. आणि त्या जातीनुसार विशिष्ट समाजातील पुरुषव्यवस्था ही त्या समाजातील व्यवस्थेनुसार शोषण करीत असते. तिच्या लैंगिकतेवर बंधन तिचे काम, कौटुंबिक जीवन, धार्मिक सांस्कृतिक नियमांच्या आधारे खडक नियंत्रण आर्थिक व्यवस्था, राजकीय व्यवस्था विवाह संस्थेचे संबंधी कडक नियम हे त्या त्या जातीतील स्त्रियांना बंधनात ठेवतात. तेव्हा दात आणि लिंगभाव या दृष्टिकोनातून विचार केला तर डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी प्रतिपादन केल्याप्रमाणे, स्त्रिया या जातीव्यवस्थेची प्रवेशदार असतात."आपली जात इतरांपेक्षा वेगळी असावी ती पवित्र राहावे व ती टिकावी याकरिता स्त्रियांवर नियंत्रणे घातली गेली. स्त्री ही निष्कलंक राहिली पाहिजे यासाठी जाती टिकवण्याचे मूळ स्त्रियाच आहेत त्यासाठी त्यांनी लेंगिकतेनुसार शुद्ध राहिली तरच जात शुद्ध राहील आणि आपआपल्या जाती शुद्ध राखण्यासाठी ब्राह्मणांपासून एकनिष्ठता तीन पर्यंत स्त्रियांवर बंधने लादली गेली." उच्च जातीचे अनुकरण करणे कनिष्ठ जातीतील लोकांसाठी प्रतिष्ठेचे वाढू लागले त्या त्या जाती प्रथेनुसार आपली जात सक्षम राहण्यासाठी पुरुषप्रधान व्यवस्थेमध्येच लिंगभावानुसार तिची जडणघडण केले गेली आजही ती आहे तशीच आहे. "जातिभेदाच्या आधारावर स्त्रियांचे अधिकार कर्तव्य ही लिंगभाव आणि नुसार ठरवली आहेत. कारण स्त्रीचे एक श्रम जात व धर्म यावर आधारित आहे." म्हणून जात लिंग भागानुसार स्त्रियांना समानतेची वागणूक समाजामध्ये दिली जाते आणि जातीच्या स्त्री व पुरुषाची सामाजिक स्थिती ठरवले जाते. जात व लिंगभावानुसार स्त्री-पुरुष विषमता, स्त्रियांचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, शिक्षण यामध्ये जातीच्याच अनुषंगाने सामाजिक संरचना ही लिंग भावानुसार आहे.

## लिंगभाव स्त्री - पुरुष विषमता

जात व लिंग भाव हे स्त्री-पुरुष विषमतेच्या स्वरूपात आढळले कारण यामध्ये एकजिनसीपणा नाही. देशपरत्वे जर निरीक्षण केले तर, त्यामध्ये वेगळेपण आहे दिसून येतो पण भारतातील सामाजिक व सांस्कृतिक दृष्ट्या लिंगभेदावर

आधारित स्त्री पुरुष विषमता आढळत असली तरी भारतातील 5000 पेक्षा जास्त जातीमध्ये स्त्री पुरुष विषमता आढळते. भारतातील धर्म हा अनेक संप्रदायामध्ये विभागला आहे. धर्माचे आधार चार वर्ण आहेत. वर्ण व जातीनुसार स्त्रीचे स्थान दुय्यम आहे. भारतातील प्रत्येक जातीनुसार त्या स्त्रीचा दर्जा ओळखला जातो. त्यामुळे स्त्री ही स्त्रीच असते पण तिची विषमता जाती नुसार ठरवली जाते. ती त्या जातीमध्ये जन्मते त्यात जातीचे रूप तिला प्राप्त होते आणि त्या जातीची नियंत्रणे तिला पाळावीच लागतात. जातीतील पुरुष जातीच्या संस्कृतीनुसार तिला ओळखत असतात. आणि तिच्यावर अधिकारही गाजवत असतात. मग हुंड्या संदर्भात असो, विवाह संदर्भात असो, विवाह झाल्यानंतर मुलगा की मुलगी जन्माला घालायची त्यासंदर्भात असो, तिच्या आयुष्याच्या अनेक महत्त्वाचे पैलू असो तिच्यावर लिंग भावानुसार नियमांची सांगड घातली जाते. तसेच तिने कोणता पोशाख घालावा, वेशभूषा, तिची भूमिका व जबाबदारी तिने कसे वागावे, कसे राहावे आणि शिक्षण, आर्थिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रातही विषमता ही जाती नुसारच आढळते.

भारतीय समाजात जातिसंस्थेच्या प्रभावामुळे विषमता वाढली आहे. कारण उच्चनीच भाव जाती, पोटजाती सर्व समाजात असल्या तरी व्यवसाय, शिक्षण, प्रतिष्ठा श्रेष्ठ कनिष्ठ हे केवळ जिथे जन्म होतो त्या जन्मावर अवलंबून आहे. भारतीय समाजातील विषमता ही जन्मावरून ठरते जन्माने श्रेष्ठत्व प्राप्त झाले तरच या समाजाचे स्थान ही श्रेष्ठ असते. अशी समाज रचना भारतातील विषमतेला आजही बळकटी आणतात आहे. आज या विषमतेचा विचार केला काही जातीतील स्त्रियांचे मुलींपेक्षा मुलांना जन्म देण्याचाच विचार करतात. याचे कारण पारंपारिक पुरुषसत्ताक मूल्यांचा पगडा आजही त्यांच्यावर आहे. त्यामुळे समाजातील स्त्रीभ्रूणहत्या यांचा वाढत्या प्रमाणामुळे लिंग भावानुसार स्त्रीची मानसिकता ही जातीच्या चौकटीतच आहे. यासंदर्भात स्त्रियांच्या घटत्या प्रमाणामुळे स्त्री-पुरुष विषमतेचे यासंदर्भात उदाहरण द्यायचे म्हटले तर आजही काही जातींमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. सांगली जिल्ह्यातील मिरज तालुक्यातील ग्रामीण भागात विशिष्ट उच्च जाती धर्मातील समाजांमध्ये स्त्रियांचे प्रमाण कमी असल्यामुळे वर पिता वधूपित्याला पैसे देऊन त्या घरातील वधू आपल्या मुलांसाठी आणली जाते व वधु कनिष्ठ जातीतील असेल तर तिला त्यांच्या धार्मिक तत्त्वानुसार तिची शुद्धता ही केली जाते. उदाहरण, मिरज तालुक्यातील मालगाव गावातील धर्माने व जातीने उच्च असणाऱ्याने कर्नाटकातील कोळी समाजातील मुलगी आपल्या घरांमध्ये सून म्हणून आणली. आज ही मुलगी पद्युत्तर शिक्षण घेत आहे. शुद्ध ते नंतर पुन्हा ती वधू आपल्या जातीतील समाजात शक्यतो जात नसे हे सत्य जेव्हा समाजासमोर आले तेव्हा त्या जाती व्यवस्थेनुसार त्या त्या समाजात लिंग भावानुसार स्त्री-पुरुष विषमता ही मोठ्या प्रमाणात दिसून आली आहे.

आज स्त्री-पुरुष विषमतेचा फटका त्या त्या जातीतील विवाह संस्थेला जबरदस्त बसत आहे. हे भावानुसार स्त्री-पुरुष विषमता ही पुरुषी वर्चस्व पणा व स्त्रियांचे वर्तन पद्धतीवर ठरलेली असते.

**लिंग भाव आणि कुटुंब संस्था**

कुटुंब हे पुरुषसत्ताक व्यवस्थेवर आधारित आहे. कुटुंबातून समाजाचे प्रतिबिंब दिसत असते. तेव्हा प्रत्येक जातीची विशिष्ट अशी संस्कृती असते. त्यातून त्या जातीतील सदस्यांना स्वतःचे ओळख प्राप्त असते. ही ओळख, जातीतील

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

स्त्री, परंपरा, प्रथा यातून होत असल्यामुळे कुटुंबातील नातेवाईकांच्या जाळ्यात पासून प्राप्त झालेली असते. कुटुंबामध्ये स्त्रियांचे सामाजिक कारण हे लिंग भावानुसार घडत असते स्त्रियांनी कुटुंबात आपल्या जातीनुसार कोणकोणत्या घटकांशी व्यवहार करावा, धार्मिक ग्रुप ते कोणती करावेत व व कोणती करू नयेत शुद्धता याबाबतीत कर्मकांडे ही स्त्रियांनी आपल्या जातीनुसार करावित."जातींच्या नियमाप्रमाणे घर आणि बाहेरचे जग यांच्यात फरक केलेला आढळून येतो. घराची शुद्धता पवित्र राखण्याच्या कामी स्त्रिया महत्त्वाची भूमिका बजावतात."त्यामुळे जातीव्यवस्था नुसार संग रचना विकसित कोणत्या जातीच्या कुटुंब असेल तर त्याच जातीच्या कुटुंबातील व्यक्तीशी विवाह होत असतो. त्यामुळे लिंग भावानुसार पावित्र्याचे जोड देऊन तिने त्या कुटुंबाचे पावित्र्य राखले पाहिजे म्हणून, "मीलेटच्या मते, पुरुषसत्ताक व्यवस्थेची प्रमुख संस्था म्हणजे कुटुंब होय. कारण व्यापक समाज आता तो अर्थ असतो आणि व्यक्तींना त्याच्याशी जोडले जाते कुटुंबव्यवस्था ही नियंत्रण आणि स्थितिवादी पण यावर पक्का ठसा उमटविणे" यावरून लिंगभावाचा भिन्नत्त्वाच्या भूमिकानुसार कुटुंबांमध्ये जातीतून नियंत्रण व भूमिका तयार केल्या जातात. तसेच समाज शास्त्रीय दृष्ट्या विचार केला तर कुटुंब हे सामाजिक संस्था आहे. त्यामुळे स्त्री ही जैविक दृष्ट्या पुनरुत्पादनाचे वास्तव आहे. समाजाचा तात्या टिकवण्याचे कार्य ही स्त्रीच करते पण पुरुष हा समाजामध्ये पितृत्व व अधिकार गाजवणारा आहे. तेव्हा पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रीला जातीस अदृश्य तो दर्जा मिळतो तो दर्जा लिंग भावानुसार ठरतो तेव्हा त्या जातीनुसार कुटुंबही घडते. जीवशास्त्रीय विचार केला तर कुटुंब हे जाते विषमतेचे केंद्र आहे. कारण प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक करण्याची सुरुवात ही कुटुंबातून होत असते ते समाजीकरण हे त्या त्या जातीच्या चौकटीतच केले जाते तेव्हा लिंग भावानुसार कुटुंबाचा विचार केला तर जात आणि जातीचा गट व्यवहार करताना कुटुंबातील नातेसंबंधाच्या चौकटीतच होते. जातीनुसार लिंगभेदावरून स्त्री-पुरुष यांच्या हक्कातील भेदाची सुरुवात ही कुटुंबातच होत असल्यामुळे जाते विषमतेचे स्वरूपही भयानक आहे.

**विवाह व लिंगभाव**

मानवी जीवनाला स्थैर्य प्राप्त होण्यासाठी नैतिकतेची चौकट आवश्यक असते. ही नैतिकतेची चौकट विवाह या सामाजिक संस्थेद्वारे पूर्ण होते. भारतीय समाज अनेक जाती, जमाती व धर्मांनी बनलेला असला तरी प्रत्येकाच्या प्रथा, भिन्न असतात त्या नैतिकतेच्या चौकटीतून बाहेर पडायला सहसा कोणीही तयार नसतात. त्यामुळे अंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या स्त्रियांना मात्र अनेक प्रकारच्या समस्यांना तोंड द्यावे लागते, कारण अंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह मध्ये तिचे श्रेष्ठत्व हे तिच्या जातीतील रूढी, परंपरा, मुल्ये, आचार विचार, भाषा अशा अनेक भूमिकेतून ठरते. आठ भारतीय समाजातील काही जाती व्यवस्थेकडे पाहिले तर जात हीच प्रतिष्ठेचा भाग बनली आहे. या प्रतिष्ठेपायी देशातील अनेक राज्यांमध्ये जाती पंचायतीतून जात्याधंता वाढत आहे. हे जात पंचायत भारतीय राज्यघटना व न्याय व्यवस्थेला न मानता स्वताचे आदेश अमलात आणते. जर त्या जातीच्या कुटुंबातील कोणत्याही स्त्री-पुरुषांनी आंतरजातीय विवाह केला तर त्यांना मारून टाकले जाते. यामध्ये त्या जातीतील स्त्री वर्गाला ज्या यातना पोहोचतात त्या लिंग भावानुसार तीव्र असतात. जात व पंचायती समोर त्या त्या जातीतील स्त्रियांना लैंगिक संबंधाचा निवाडा करण्याचा वेळही येते. विवाह व लैंगिकता हे मध्यवर्ती मानून जात व लिंगभाव यांच्या स्त्री जीवनावर फार

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

मोठा परिणाम होतो, बंदिस्त गट हे जातिव्यवस्थेच्या अस्तित्वाचे तत्व मानून विवाह मधून जातीच्या शुद्धतेची सीमारेषा ठरत असते.

आज काल विवाह संदर्भात वधू वर पाहिजे असे वर्तमानपत्रातून जाहिराती येतात. पण त्या जाहिरातीकडे बारकाईने पाहिल्यास असे लक्षात येते की विवाह संबंधी चे वधू-वराची जात, गट, प्रांत, गोत्र असा उल्लेख असतो. त्यामध्ये SC, ST, NT क्षमस्व असाही उल्लेख असतो. त्याचप्रमाणे त्या त्या जातीतील वधू वर सूचक मंडळ स्वजातिय विवाहाच्या तत्वानुसार विवाह मंडळे काढून कार्यरत आहेत. विवाह संदर्भात जातीनुसार लिंगभाव हे जातीनिहाय सीमारेषा सांभाळण्याचा प्रयत्न होत आहे.

**आर्थिकता व लिंगभाव**

भारतीय समाजातील अर्थव्यवस्था ही जातीवर आधारित आहे. त्याप्रमाणे, जातीवर आधारित असलेले व्यवसाय लिंग भावानुसार किंवा लिंगआधारित श्रम म्हणून पाहिले जाते. एखादी जात जो धंदा सातत्याने करेल त्यामध्ये त्या जातीतील स्त्रियांचे योगदान असे. आज पारंपारिक व्यवसाय आणि जात संपुष्टात आले असले तर ग्रामीण भागात आजही परंपरागत व्यवसाय दिसून येतात. त्याच पद्धतीने आपली उपजीविका करण्यासाठी "काही जजमानी पद्धतीतील जजमान कुटुंबाशी संबंध असलेल्या स्त्रिया व पुरुष या तिथल्या सेवेकरी असतात त्याच्या कार्याचे स्वरूप हे ठरलेले असते विंध्य पर्वताच्या उत्तरेकडे न्हावी जातीची स्त्रीही जजमानी कुटुंबातील स्त्रियांचे व्यक्तिगत कामे करतात" अशा प्रत्येक प्रांतात ज्या अस्पृश्य जाती आहेत त्या अस्पृश्य जातींच्या स्त्रियांनी आपली परंपरा सोडली नाही. उदाहरणार्थ अस्पृश्य जातीच्या स्त्रिया सुईने म्हणून, समारंभांच्या वेळी त्यांच्या असण्याच्या भूमिकाही पार पाडत असतात" जातीशी जोडल्या गेलेल्या व्यवसाय धंद्याचे सातत्य टिकविण्यासाठी स्त्रिया जे काम करतात त्याचे महत्त्व हे सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे असे मानले जाते" स्त्री यांच्याकडून जातीचे व्यवसाय टिकावेत असे त्या त्या समाजातील संकेत आहेत. त्यामुळे आज हे मुलींना शिक्षणापासून वंचित तही ठेवले जाते. लिंगभाव व अर्थव्यवस्था ही जातींशी निगडित आहे हे नाकारता येत नाही यासंदर्भात "दिल्लीमध्ये मेहत्तर स्त्रियांचा अभ्यास करण्यात आला तेव्हा कार्लेकर (1996) त्यांना असे आढळले की, आपल्या जातीतल्या पारंपारिक व्यवसायातील कर्मकांडे अस्वच्छ वाटल्यामुळे व्यवसाय सोडून देणाऱ्या पुरुषांची संख्या वाढली पण स्त्रिया मात्र त्याच पारंपारिक कार्यक्षेत्रात राहिल्या आहेत."

समाजामध्ये च्या प्रमाणे जातीनुसार श्रमविभागणी झाले त्याच प्रमाणे लिंगानुसार कामाचे वाटपही झाले. यातून लिंगआधारित अर्थव्यवस्था आणि जातीधिष्टित श्रमविभागणी चा संबंध जवळचा असल्याचे दिसून येते. कोणत्या जातींनी कोणती कामे करावेत याविषयी जातीतील स्त्रियांना लिंगानुसार श्रम करण्यास भाग पाडले. यानुसार जर विचार केला तर भारतातील श्रमविभागणी चे तत्व जात आहे. त्यानुसार स्त्री-पुरुष श्रमविभागणी जातीच्या उत्पादन पद्धतीचा पाया आहे. स्त्रियांच्यावर उत्पादक व अनुत्पादक श्रम यांचा मोठा भार टाकला जातो. या संदर्भात मानववंशशास्त्रात विशाल यांनी, "स्त्रियांना दुय्यम दर्जा दिला गेला आहे त्यासाठी त्यांचे शारीरिक व कार्यक्षमता हे स्पष्टीकरण कधीच पुरेसे नव्हते तिची स्वतःची भूमिका अशी आहे की उत्पादक कामापासून स्त्रियांना

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

जे दूर केले गेले याचे कारण स्त्रियांच्या शारीरिक व कार्यक्षमतेत परीक्षा सामाजिक दृष्ट्या तिला जे दुर्बल मानले गेले आणि त्यापासून तिला शारीरिक अस्तित्वाचे गुलाम बनविले गेले."

काही कनिष्ठ जातीतील स्त्रियांना दारिद्यास तोंड द्यावे लागते, दारिद्य कमी करण्यासाठी दररोजचा आर्थिक प्रश्न उभा राहात असतो. तसेच जातीतील पुरुष व्यसने असतात तर अनेक समस्यां निर्माण होत असतात. या जातीतील स्त्रियांचे शिक्षण नसल्याकारणाने काहीतरी रोजगार करण्यासाठी घराबाहेर पडावे लागते. त्या स्त्रिया कमावत्या झाल्या म्हणून जातीव्यवस्थेचे संबंधित त्यांना पाळावे लागतात पण या यामध्येही श्रमाचे विभागणी ही जातीनुसार होत असते उच्च जातीतील स्त्री ही शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय घटकानुसार ती प्रतिष्ठित असते तेव्हा ती त्या त्या पदावर उच्च जातीची स्त्री म्हणूनच विराजमान होते तिला मानसन्मान असतो. तसेच कनिष्ठ जातीतील स्त्रीही शिक्षण क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात आरक्षणाच्या या माध्यमातून तिला पद मिळते. तिचे काम, पद आणि तिची बुद्धिमत्ता याचा विचार न करता ते कनिष्ठ जातीतील आहे या दृष्टीने पाहिले जाते.

आज स्त्रिया विकासाच्या प्रक्रियेत अग्रेसर आहेत. आर्थिक नियोजनामध्ये स्त्रिया आणि विकास याबाबतची धोरणे अमलात आणली जात आहेत. देशातील आर्थिक व सामाजिक विकासात स्त्रियांच्या दुर्लक्षित घटकांवर भर दिला जात आहे. पण स्त्रियांच्या भूमिका, श्रम, रोजगार समजावून घेऊन धोरणकर्त्यांनी स्त्रियांच्या उत्पादक भूमिकेला महत्त्व दिले. "धोरणांची अंमलबजावणी करणारे जे तथाकथित लिंगभावसंवेदी कार्यक्रम घेतात. त्यांचा उद्देश सरकारी योजनांना व विकास कार्यक्रमांना अधिक प्रभावी बनवण्यासाठी लिंग भावा संबंधाकडे बघणे व स्त्रियांच्या 'उत्पादक उपयोगितेचा' वापर करून घेण्यासाठी विकास कार्यक्रमांमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढवणे व स्त्रियांमध्ये गुंतवणूक करणे असा असतो. उदाहरण आज जिथे तिथे बचत गट निर्माण झाले आहेत ते बचत गट त्या त्या जातीतील समूह कार्यरत असतात असे दिसून येते. लिंगभाव व विकास यांचा विचार होताना लिंगभाव ही जातीय अर्थव्यवस्थेशी आणि श्रमविभागणी शी निगडीत आहे.

**राजकीय व्यवस्था व लिंगभाव**

जातीप्रधान भारतीय समाजव्यवस्थेत पुरातन काळापासून स्वातंत्र्यपूर्व काळापर्यंत लोकांची असंख्य जाती उपजाती विभागणी केलेली आहे. दुसऱ्या समाजास हीन मानून जात- उपजात समूहाव्यतिरिक्त व्यवहार केले जात नसत स्वातंत्र्यानंतर मात्र धर्म जात या घटकांवर आधारित भेदभाव करता येत नाही अशी घटनात्मक तरतूद असून आजही जातीवर आधारित भेदाभेद करण्याचे प्रथा संपली आहे असे म्हणता येणार नाही. जातीचे प्राबल्य आणि प्रभाव सर्वत्र दिसून येतो या कारणाने सर्व स्त्रिया एक म्हणून त्या सर्वांच्या समस्या एकच आहेत हे मान्य करावे लागेल. मानवी इतिहासात व्यक्ती गट अथवा वर्ग ही सत्तेचे केंद्रे राहिली असली तरी या सर्वांचे स्वरूप हे पुरुष प्रभुत्वात्मकच राहिलेले आहे. म्हणून "'झिला ॲसनस्टाईन' यांनी वर्गावर आधारित सत्तेच्या सिद्धांताचे सांगड लिंगावर आधारित सत्तेच्या सिद्धांताशी घालण्याचे निकड प्रतिपादित केले आहे." तेव्हा उच्च जातीतील पुरुष आणि स्त्रिया देखील कनिष्ठ जातीतील स्त्री कडे पाहताना अगदी तुच्छतेने व्यवहार करतात. कनिष्ठ जातीतील स्त्री एक व्यक्ती म्हणून केंद्र व राज्य शासन त्यांच्या पक्षाने करण्यासाठी विविध विकासात्मक योजनाचे अंमलबजावणी करीत आहेत.

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

याकरिता या जातीतील स्त्रियांनी शिक्षण घेऊन सामाजिक आर्थिक व राजकीय दर्जा सुधारावा याकडे विशेष रुपाने लक्षही दिले जात आहे. 1992 मध्ये केलेल्या 73 व्या घटनादुरुस्तीनुसार राज्यघटनेच्या 243 ख (1) नुसार स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कनिष्ठ जातीतील स्त्रीयांनी प्रतिनिधित्व करण्यासाठी आरक्षण लागू केले याच संधीचा फायदा प्रत्येक जातीच्या महिलांसाठी होऊ लागला आणि प्रत्येक जातीतील स्त्री ही राजकारणात येऊ लागली. यासाठी स्त्रियांना राजकीय सत्तेत घटनात्मक प्रवेश करण्यासाठी संघर्षही करावा लागला. त्यांच्या कार्याचे मूल्यमापन लिंगभाव चौकटीतून पाहणे गरजेचे आहे. भारतीय समाजामध्ये जाती श्रेष्ठत्वाच्या आधारावर जो भेदभाव केला जातो तोच भेदभाव राजकीय व्यवस्थेत जातीनुसार लिंगभाव भेद केला जातो. पण भारतीय संसदेतील राजकारणात जात हा घटक आजही महत्त्वाचा मानला जातो. "1991 ते 1996 च्या दरम्यान ज्या 39 क्रिया संसदेमध्ये होत्या. शास्त्रीय समस्त भारतीय स्त्रियांचे प्रतिनिधित्व करीत होत्या असे सकृतदर्शनी दिसत असले तरी त्यामधील सर्वाधिक स्त्रिया या मध्यमवर्गातील उच्चजातीय व्यावसायिक असून त्यांचा कोणत्याही स्त्री चळवळ विषयी संबंध नव्हता यातील 6 स्त्रिया उच्चजातीय म्हणजे ब्राह्मण जातीतील होत्या त्यांचे संसदेतील प्रमाण 17. 74 टक्के होते हे प्रमाण खूप होते मागास वर्गीय जातीतील स्त्रियांसाठी 22 टक्के जागा राखीव असतानाही त्यांचे संसदेतील प्रमाण हे अत्यल्प म्हणजे 4.1 टक्के एवढेच होते.

भारतीय राज्यघटनेत धर्म, जाती, वंश, लिंग, यावर आधारित कोठेही भेदाभेद केला जाऊ नये अशी तरतूद असल्या तरीही आज हे कनिष्ठ जातीतील स्त्रियांच्या कडे राजकीय व्यवस्थेमध्ये जातीनिहाय व्यवहार केले जातात, कारण कनिष्ठ जातीतील यांच्याकडे लिंग भेदाचे शिकार अशा अर्थाने पाहिले जाते परिणामी त्यांचे मानसिक खच्चीकरण होऊन त्यांच्या कार्यकर्तृत्वावर असंख्य मर्यादा आहेत या संदर्भात उदाहरणार्थ पाहायचे झाले तर, ग्रामीण पंचायती राज्यातील दलित स्त्रियांचा हक्क आणि राजकीय सहभाग याबाबत "नवसर्जन ट्रस्ट या संस्थेच्या वतीने गांधीजीचे भूमी असलेल्या गुजरात राज्यांमधील प्रत्यक्ष निवडून आलेल्या 86 सरपंच व 14 नामनिर्देशित अशा 100 दलित स्त्रियांच्या अभ्यासाचे निष्कर्ष हाती आले त्यामध्ये केवळ दलित असल्याकारणाने अनेक स्त्रियांना त्या सरपंच असल्या तरी त्यांच्या कार्यालयात 40% स्त्रियांना सरपंच असूनही त्यांना खुर्चीवर न बसता खाली बसण्यासाठी प्रभावी जातीतून दबाव आणला जातो, तसेच 64.5 टक्के दलित स्त्रियांना वेगळा कपातून चहा दिला जातो. 31 टक्के स्त्रियांना कार्यालयात इतर सदस्य बरोबर काहीही खाण्याचा हक्क नाही." यावरून भारतीय समाजव्यवस्थेमध्ये व्यवस्थेच्या अंतर्गत स्त्री यांच्याकडे पाहिले जाते तसेच इतर स्त्रीयांशी तुलना केली तर त्या लिंग बैलाच्या शिकार होतात किंवा त्यांना लिंगभावाचा सामोरे जावे लागते परंतु कनिष्ठ जातीतील स्त्रियांना राजकीय व्यवस्थेमध्ये सुद्धा, वर्ग, लिंग अशा तिहेरी भावांना सामोरे जावे लागते.

सारांश रूपाने असे म्हणता येईल की, आजच्या आधुनिक काळात जात व लिंग भाऊ यामध्ये बदल घडून आले आहेत का? याचे अभ्यासाअंती असे दिसून येते की, हे ग्रामीण व शहरी भागात तसेच प्रत्येक क्षेत्रात जातीच्या सीमारेषा आहेत. आजही तत्वे हे लिंगभाव विषमतेचे स्वरूप स्पष्ट करते. जातीच्या उतरंडीत यांचा संबंध हा

Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

लिंगभावाचा च्या सहाय्याने जोडला जातो असे म्हणून असे म्हणता येईल की, जात हे जोपर्यंत मरत नाही तोपर्यंत लिंगभावाचा मुद्दा जिवंत राहील.

## संदर्भ पुस्तके

*Berreman Gerald, D.1979, Caste and Other Inequalities: Essage On Inequalities, Ved Prakash Vatak Folklore, Institution, Meerat Compony, Delhi.*

*भागवत विद्युत व रेगे शर्मिला, जातीयतेच्या एकाधिकार शाहीतून होणारे लैंगिक शोषण: मराठी शृंगारिक लावणी चा अभ्यास, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ,.*

*भागवत विद्युत, रेगे शर्मिला पलसाने वंदना, 1994, स्त्री जीवनाचे गुंतागुंत, स्त्री अभ्यास केंद्र, समाजशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे, विकास अध्ययन केंद्र, मुंबई.*

*Chakravarti Uma 2006, Genderring Caste: Through a Feminist lens, Pulication Stree, Culcatta.*

*Deasi Neera and Krishnaraj Maithreyi, 1990, Women and Society in India, Ajanta Publications, Delhi.*

*Gate Smital, 1998, Development of Women, Yashwantrao Chavan Academy of Development of Administration, Pune.*

*Gupta Shanti Swarup 1991, Verna, Castes And Scheduled Castes Concept, Publishing Company, New Delhi.*

*लांजेवार ज्योती 2005, भारतीय समाज आणि स्त्री सुगावा प्रकाशन, पुणे.*

*रोहन ते सुगणा 1999 (अनुवाद: जोशी वैशाली पेंढारकर) विकासाच्या प्रक्रियेतील स्त्री प्रश्न, स्त्री अभ्यास केंद्र, पुणे विद्यापीठ, पुणे.*

*पटवर्धन अ. के. 1889 स्त्री आणि समाज प्राची प्रकाशन मुंबई.*

*Upadhyay H.C. 1991, Status Of Women in India, Anmol Publication, New Delhi.*

*Verma S.B. 2005, Status oF Women in Modern India, Deep and Deep Publications Pvt. Ltd. New Delhi.*

*नियतकालिके*

*बायजा 2001,2007 पुणे.*

*प्रबोधन प्रकाशन, ज्योती 2008 (अंक दुसरा), महिला दिन विशेषांक, समाजवादी प्रबोधिनी, इचलकरजी.*

*सुगावा 1999, दलित महिलांचे प्रश्न ( डॉ. बाबासाहेब आंबडकर प्रेरणा विशेषांक), सुगावा प्रकाशन, पुणे.*

*Copyright © 2018, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*